
धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## समाईक भिंतीच्या वादातून तलवार, हंटरने मारहाण



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ जून -**

तुळजापूर तालुक्यातील गुळहळी येथे समाईक भिंतीच्या वादातून एका व्यक्तीला तलवार, हंटर व काठीने मारहाण करून गंभीर जखमी केल्याप्रकरणी नळदुर्ग पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

केशव आण्णाप्पा हलकंबे (वय ४८, रा. गुळहळी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दत्ता काळुंके, अंकुश दत्ता काळुंके व सुमीत अंकुश काळुंके (सर्व रा. गुळहळी) यांनी १४ जून रोजी दुपारी समाईक भिंतीच्या कारणावरून शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी तसेच तलवार, हंटर आणि काठीने मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०९, ३ (५) तसेच शस्त्र अधिनियम कलम ४ व २५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### राष्ट्रीय शिक्षणरत्न पुरस्कार प्राप्त बिभिषण रोडगे यांचा लोणीत सत्कार

**परंडा, १७ जून -**

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ, लोणी यांच्या वतीने बावची विद्यालय, परंडाचे संस्थापक अध्यक्ष बिभिषण रोडगे सर यांना प्राप्त झालेल्या राष्ट्रीय शिक्षणरत्न पुरस्कार २०२६ निमित्त विशेष सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी केमदार होते. यावेळी शिवसेना तालुका प्रमुख अण्णासाहेब जाधव, वसंत जगताप, महादेव माळी, विलास डांगे, दादासाहेब फुरडे यांच्यासह लोणी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच बावची विद्यालयाचे प्राचार्य नारायण खैरे, शुभम रोडगे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारीही उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास वाघमारे यांनी केले, तर संजय वलेकर यांनी आभार मानले. या सत्कार समारंभामुळे परिसरातील शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.



### रंजना हासुरे यांची जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश प्रवक्तेपदी निवड

**लोहारा, १७ जून -**

हिंगोली येथे १४ जून रोजी झालेल्या जिजाऊ ब्रिगेडच्या मराठवाडा विभागीय आढावा बैठकीत प्रदेश सदस्य रंजना हासुरे यांची जिजाऊ ब्रिगेड महाराष्ट्र राज्याच्या प्रदेश प्रवक्तेपदी निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे. लोहारा तालुका अध्यक्ष पदापासून सुरू झालेला त्यांचा संघटनात्मक प्रवास आता प्रदेश प्रवक्तेपदापर्यंत पोहोचला आहे. लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील होळी गावच्या कन्या आणि लोहारा तालुक्यातील हराळी गावच्या सून असलेल्या रंजना हासुरे यांनी जिजाऊ ब्रिगेडच्या माध्यमातून सामाजिक व प्रबोधनात्मक कार्यात विशेष योगदान दिले आहे.



### लोटस पोदार लर्न स्कूलचा ८ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**उमरगा, १७ जून -**

लोटस पोदार लर्न स्कूल, उमरगा यांचा ८ वा वर्धापन दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. तसेच कै. भुजंगराव घुगे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शाळेच्या आठ वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. कार्यक्रमास अध्यक्ष व्यंकट आरगडे, उपाध्यक्ष युवराज गायकवाड, सचिव विशाल कोकरे, संचालक मंडळाचे सदस्य, प्राचार्य बी. पी. सिंह, उपप्राचार्य अतुल फावडे तसेच शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी शाळेच्या यशस्वी वाटचालीबद्दल अभिनंदन व्यक्त करत विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम आनंदी आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.



### जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर; ५५ रक्तदात्यांचा सहभाग

**धाराशिव, १७ जून -**

स्वर्गीय दिलेर बाळासाहेब देशमुख यांच्या जयंतीनिमित्त तसेच स्वर्गीय शिवाजी देशमुख यांच्या स्मरणार्थ दिलेर प्रतिष्ठानच्या वतीने गौर येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात ५५ रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले. रक्तदात्यांना दिलेर प्रतिष्ठानतर्फे स्कूल बॅग व टिफिन डबा भेटवस्तू म्हणून देण्यात आले. रक्तदानाच्या माध्यमातून स्व. दिलेर बाळासाहेब देशमुख आणि स्व. शिवाजी देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी दिलेर प्रतिष्ठानचे अध्यक्ष सिद्धांत देशमुख, गोविंद देशमुख, सरपंच धनंजय देशमुख, शाम देशमुख, हनुमंत माने, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रमेश देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

## वाशीत रात्रीची धडक कारवाई; मुरुम वाहतूक करणारे दोन डंपर जप्त

### उत्खनन माफियांमध्ये खळबळ...

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१७ जून -**

वाशी तालुक्यात पवनऊर्जा प्रकल्पांच्या कामांसाठी सुरू असलेल्या मुरूम उत्खनन आणि वाहतुकीवर महसूल विभागाने रात्रीच्या वेळी धडक कारवाई करत दोन डंपर जप्त केले. तहसीलदार प्रकाश मेहेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन दिवसांपूर्वी झालेल्या या कारवाईची तालुकाभर जोरदार चर्चा सुरू आहे.

तालुक्यात विविध पवनचक्की प्रकल्पांच्या उभारणीसाठी मोठ्या प्रमाणात मुरम उत्खनन करून त्याची वाहतूक केली जात असल्याची चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून सुरू होती. काही ठिकाणी मर्यादित रॉयल्टी भरून मोठ्या प्रमाणावर गौण खनिजाचे उत्खनन व वाहतूक केली जात असल्याचे आरोप स्थानिक नागरिक आणि शेतकरी करत आहेत. त्यामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असून पर्यावरणालाही फटका बसत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर महसूल विभागाच्या पथकाने रात्री अचानक धडक कारवाई करत मुरम वाहतूक करणारे दोन डंपर ताब्यात घेतले. कारवाईची माहिती मिळताच काही वाहन चालकांनी डंपरमधील मुरम खाली करून वाहनांसह घटनास्थळावरून निघून जाण्याचा प्रयत्न केल्याची माहिती समोर येत आहे.

कारवाईदरम्यान महसूल पथक आणि काही वाहन चालकांमध्ये बाचाबाची झाल्याची चर्चा असून काही काळ परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी वाशी पोलीस ठाण्याचे कर्मचारीही घटनास्थळी उपस्थित होते, अशी माहिती मिळत आहे.

विशेष म्हणजे, महसूल विभागाच्या कारवाईची चाहूल लागताच काही अन्य वाहने घटनास्थळावरून पसार झाल्याची चर्चा रंगली आहे. त्यामुळे जप्त करण्यात आलेल्या दोन वाहनांव्यतिरिक्त पळून गेलेल्या वाहनांची ओळख पटवून त्यांच्यावरही कारवाई होणार का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



दरम्यान, जप्त वाहनांवरील पुढील कारवाई आणि कारवाईतून निसटलेल्या वाहनांबाबत महसूल प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे. तहसीलदार प्रकाश मेहेत्रे यांच्या या रात्रीच्या धडक कारवाईमुळे मुरम उत्खनन व वाहतूक करणाऱ्या घटकांमध्ये मोठी खळबळ उडाली असून अवैध उत्खननाविरोधातील कारवाई अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## लोहाऱ्यात अवैध जुगार अड्ड्यांवर धडक कारवाई; ९.३८ लाखांचा मुद्देमाल जप्त, १२ जण ताब्यात



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१७ जून -**

धाराशिव जिल्ह्यात अवैध व्यवसायांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत लोहारा परिसरातील अवैध जुगार अड्ड्यांवर पोलिसांनी धडक कारवाई करत १२ जणांना ताब्यात घेतले असून, सुमारे ९ लाख ३८ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

प्राप्त झालेल्या खात्रीशीर गोपनीय माहितीनुसार लोहारा येथील काणेगाव रोड तसेच माकणी चौक परिसरातील शंभूराजे हार्डवेअर येथे अवैधरित्या सुरू असलेल्या तीन पत्ती (तिरट) जुगार अड्ड्यांवर एकाच वेळी छापेमारी करण्यात आली. या कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण सोमवंशी, सुरेश कासुळे, पोलीस उपनिरीक्षक रामचंद्र बहुरे तसेच क्यूआरटी पथकातील अंमलदार व चालक यांनी सहभाग घेतला. छापेमारीदरम्यान १३ संशयित निष्पन्न झाले असून त्यापैकी १२ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे, तर एक संशयित फरार आहे. संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७ अंतर्गत लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी आरोपींकडून जुगाराचे साहित्य, मोबाईल फोन, एक चारचाकी वाहन, सहा दुचाकी वाहने व इतर साहित्य असा एकूण ९.३८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दरम्यान, जिल्ह्यात अवैध जुगार, मटका, हातभट्टी दारू, अवैध मद्यविक्री, अमली पदार्थांची तस्करी व विक्री तसेच इतर बेकायदेशीर व्यवसायांविरोधात पोलीस प्रशासनाकडून सातत्याने प्रभावी कारवाया सुरू असून, अशा कारवाया यापुढे आणखी तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## दिव्यांग प्रमाणपत्र प्रकरणी २१ शिक्षकांच्या प्रमाणपत्रांत त्रुटी; विभागीय चौकशी सुरू

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१७ जून -**



धाराशिव जिल्ह्यात जिल्हा अंतर्गत बदलीसाठी दिव्यांग अथवा दुर्धर आजाराचे प्रमाणपत्र सादर केलेल्या शिक्षकांच्या प्रकरणात महत्त्वाची माहिती समोर आली आहे. जिल्हाशल्य चिकित्सक यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने १०० शिक्षकांच्या दिव्यांग प्रमाणपत्रांची तपासणी केली असता २१ शिक्षकांच्या प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत. कळंब येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल मुळे यांनी याबाबत तक्रार दाखल करून संबंधित शिक्षकांची उच्चस्तरीय चौकशी व आरोग्य तपासणी करण्याची मागणी केली होती. त्यानुसार समितीने तपासणी करून अहवाल शिक्षण विभागाकडे सादर केला.

त्रुटी आढळलेल्या २१ शिक्षकांविरुद्ध विभागीय चौकशी सुरू असून चौकशी पूर्ण झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. रविंद्र खंदारे यांनी लेखी पत्राद्वारे दिली आहे.

## हुंड्यासाठी छळ; विवाहितेच्या आत्महत्येनंतर पतीसह तिघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ जून -**

लोहारा तालुक्यातील आष्टाकासार येथे विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याप्रकरणी पती, सासू आणि सासऱ्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्या धोंडुशा सुलतानपुरे (रा. आष्टाकासार, ता. लोहारा, जि. धाराशिव) यांनी दि. १४ जून २०२६ रोजी पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी मयताच्या नातेवाईक संगिता राजेंद्र सारणे (वय ३८, रा. दाळींब, ता. उमरगा, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून धोंडुशा नागनाथ सुलतानपुरे, चंद्रकला नागनाथ सुलतानपुरे आणि नागनाथ धोंडप्पा सुलतानपुरे (सर्व रा. आष्टाकासार) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, आरोपींनी मेडिकलचे दुकान मोठे करण्यासाठी पाच लाख रुपयांची मागणी केली होती. तसेच लग्नामध्ये रितीरिवाजाप्रमाणे मानपान झाले नसल्याचे कारण देत विद्याला वारंवार शिवीगाळ करून शारीरिक व मानसिक त्रास दिला. या छळाला कंटाळून विद्याने आत्महत्या केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

याप्रकरणी मुरूम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## तुळजाभवानी मंदिरातील कथित गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१७ जून -**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानातील सुरक्षा व हाऊसकीपिंग व्यवस्था सांभाळणाऱ्या कंपन्या तसेच काही कर्मचारी आणि कथित बोगस पुजाऱ्यांच्या संगनमतातून भाविकांना व्हीआयपी गेटमधून दर्शनासाठी प्रवेश देऊन आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचा आरोप करत याची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी अप्पर जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



निवेदनात सुरक्षा रक्षक व हाऊसकीपिंग कर्मचाऱ्यांची संख्या, त्यांची बायोमेट्रिक हजेरी, नियंत्रण व्यवस्था याबाबत माहिती सार्वजनिक करण्याची मागणी करण्यात आली आहे. काही कर्मचारी व कथित बोगस पुजाऱ्यांच्या मदतीने आर्थिक व्यवहार करून भाविकांना व्हीआयपी प्रवेश दिला जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. यामुळे सर्वसामान्य भाविकांना दर्शनासाठी तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशी मागणी केली आहे. निवेदनावर ॲड. धीरज पाटील, अमोल कुतवळ, रणजीत इंगळे, आनंद जगताप, अक्षय परमेश्वर, प्रगती लोंढे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## तेरणा अभियांत्रिकीत फ्रेशर्स पार्टी; गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ जून -**

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी आयोजित फ्रेशर्स पार्टी व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, तांत्रिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरीचा गौरव करण्यात आला.



यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, प्राध्यापक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

प्रथम वर्ष परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी, विद्यापीठ स्तरावर यश मिळवणारे विद्यार्थी तसेच विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. याशिवाय मिस्टर फ्रेशर्स २०२६ म्हणून ओम काकडे तर मिस फ्रेशर्स २०२६ म्हणून स्नेहल मसे यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

## पिकासो ॲपद्वारे ४० हजारांची ऑनलाइन फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१७ जून -**

पिकासो पमध्ये हेराफेरी करून एका तरुणाच्या बँक खात्यातून ४० हजार रुपये वळवून फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मुकेशकुमार हरदवारी लालगाव याने दि. ५ जून २०२६ रोजी दुपारी सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी नितीन नानासाहेब गवारे (वय ३१, रा. जवळा (नि), ता. परंडा, जि. धाराशिव) यांच्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधला. आरोपीने स्वतःच्या मोबाईल क्रमांक ९५५२५५९४२१ वरून पिकासो पमध्ये हेराफेरी करून नितीन गवारे यांच्या बँक खात्यातून ४० हजार रुपये वळवून आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप आहे.

याप्रकरणी नितीन गवारे यांनी १६ जून २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.


घटनेचा पुढील तपास परंडा पोलीस करत आहेत.

## ५० वर्षांचा रस्त्याचा वाद संपला : तुगाव-अचलेर मार्ग खुला करण्याचे तहसीलदारांचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.१७ जून -**

मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत प्रस्तावित असलेल्या तुगाव-चौगुलेवस्ती-आचार्यतांडा-इंगोलेतांडा-अचलेर या महत्त्वाच्या शेतरस्त्यावरील तब्बल पन्नास वर्षांचा वाद अखेर निकाली निघाला आहे. उमरगा तहसीलदार गोविंद येरमे यांनी संबंधित रस्ता खुला करण्याचे आदेश दिल्याने रखडलेले रस्त्याचे काम मार्गी लागण्याचा मार्ग मोकळा झाला असून परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

या भागातील नागरिकांना अनेक वर्षांपासून रस्त्याअभावी शेतमाल वाहतूक, विद्यार्थ्यांचे शिक्षण, रुग्णांची ने-आण तसेच दैनंदिन दळणवळणासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत या मार्गाचे काम सुरू करण्यात आले होते. मात्र काही शेतकऱ्यांनी हरकती घेतल्याने आणि अडथळे निर्माण झाल्याने काम रखडले होते.



या प्रकरणी महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था आणि ग्रामपंचायत अंबरनगर यांनी मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६ च्या कलम ५ अंतर्गत अर्ज दाखल करून गाव नकाशातील अस्तित्वात असलेला रस्ता खुला करून देण्याची मागणी केली होती. त्यानंतर तहसीलदार गोविंद येरमे यांनी दोन्ही पक्षांची सुनावणी घेतली. महसूल विभाग, मंडळ अधिकारी आणि भूमी अभिलेख विभागाच्या अहवालांचा सखोल अभ्यास करून स्थळपाहणीही करण्यात आली.

भूमी अभिलेख कार्यालयाने ८ मे २०२६ रोजी केलेल्या मोजणीमध्ये संबंधित रस्ता गाव नकाशात अस्तित्वात असल्याचे स्पष्ट झाले. निश्चित करण्यात आलेल्या हद्दी व खुणांनुसार रस्ता खुला करण्यास कोणताही कायदेशीर अडथळा नसल्याचे निष्पन्न झाल्यानंतर तहसीलदारांनी रस्ता खुला करण्याचे आदेश दिले.

आदेशानुसार अंबरनगर (मुरूम) येथील गट क्रमांक २६ तसेच जुना गट क्रमांक ६०९ मधील गाव नकाशावर नोंद असलेला रस्ता अभिलेखानुसार निश्चित करण्यात आलेल्या हद्दीत खुला करण्यात यावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच मंडळ अधिकारी, मुरूम यांनी प्रत्यक्ष रस्ता खुला करून त्याबाबतचा अहवाल सादर करावा व आवश्यक कार्यवाही पूर्ण करावी, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, २ जून २०२६ रोजी दिलेल्या या निकालामुळे तुगाव, चौगुलेवस्ती, आचार्यतांडा, इंगोलेतांडा आणि अचलेर परिसरातील शेकडो शेतकरी व ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. अनेक वर्षांपासून वादाच्या भोवऱ्यात अडकलेला मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील हा रस्ता आता प्रत्यक्षात साकारण्याचा मार्ग मोकळा झाला असून नागरिकांच्या प्रतीक्षेला अखेर पूर्णविराम मिळण्याची चिन्हे दिसत आहेत.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# शहराची स्वच्छता करणाऱ्यांना पगार वेळेत मिळावा




तभा वृत्तसेवा / प्रमोद सुरवसे

लातूर दि. १७ जून : मागील तीन महिन्यांपासून पगारी थकल्या असल्याने शहरातील जवळपास४५० घंटागाडी कामगारांनी मंगळवारी सर्व घंटागाड्या आंबेडकर पार्कवर लावून कामबंद आंदोलन केले . दोन दिवसात मागील दोन महिन्यां चा पगार देण्याचे आश्र्वासन मिळाल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले .

घरोघरी जाऊन कचरा जमा करण्याचे काम ठाण्याच्या अशोक एंटरप्राईजेस या कंपनीला देण्यात आले असून या गुत्तेदाराने कामात सातत्य ठेवल्यामुळे शहरातील कचरा वेळेच्या वेळी उचलला जात आहे .

कामगार दिवसभर शहरात फिरून कचरा जमा करतात . कचरा निघाल्याकडे शहर कसे स्वच्छ, नीटनेटके दिसत असल्यामुळे रोगराई को सो दूर राहते . शहरात घाणीचे साम्राज्य नष्ट होत असल्यामुळे कोणताच रोग शहरात शिरकाव करू शकत नाही . पण कचरा उचलण्याचे पुण्याचे काम करणाऱ्या कर्मचार्यांचा पगार मागील तीन महिन्यांपासून झाला नाही . एकतर इतर कर्मचाऱ्यांच्या तुलनेत कमी पगारांवर काम करायचे आणि तो ही वेळेवर मिळत नसल्यामुळे या कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे .

सध्या शाळा - कॉलेज सुरु झाली असल्यामुळे आपल्या लेकरांना वह्या - पुस्तके, गणवेश तसेच इतर त्यांना उपयोगी साहित्य, शाळा - कॉलेजची फीस इत्यादी साठी पैशाची अत्यंत गरज असते . आणि अशा वेळी पैसा मिळत नसेल तर ? अशावेळी काय करावे त्या कामगारांनी गुत्तेदारही तीन महिन्यांपासून पगारी देत नसल्यामुळे वैतागून कामारांनी हे आंदोलन केले आणि संपूर्ण पगार दिल्याशिवाय कामावर न जाण्याचा निर्णय घेतला .

आंदोलन केल्यामुळे अशोक एंटरप्राइजेस चे मुन्ना पाल, अँड. चंद्रकांत साबदे, मनपाचे स्वच्छता निरीक्षक धोंडिबा सोनवणे यांनी मध्यस्थी करून दोन दिवसात मागील तीन महिन्यांचा पगार दिला जाईल, असे आश्र्वासन दिल्यामुळे संप मागे घेण्यात आले . विशेष म्हणजे गेल्या सहा महिलांपासून गुत्तेदाराचे बील मिळाले नसल्यामुळे कामगारांचा तीन महिन्यांपासून पगार झाला नाही .

घंटागाडी चे म्हणजेच शहरातील घरोघरी जाऊन कचरा जमा करण्याचे गुत्ते लातूर सोडून इतर जिल्ह्यांतील संस्थेला का दिले ? शहरातील कचरा काढून आम्ही मनपावर, गुत्तेदारावर तसेच जनतेवर उपकारच करतो, आमच्या मुळेच रोगराई होत नसल्यामुळे जनताही रोगमुक्त राहते . मग आमचा पगार का थकविला जातो . असा सवालही कामगार करत आहेत .

मनपाच्या तिजोरीत पंधराव्या वित्त आयोगातून८१ कोटी शासनाने जमा केले आहेत . परंतु सदर निधीतून देणे देण्या ऐवजी तो निधी विकास कामावर खर्च करा . अशी मागणी काही नगरसेवकांकडून होत असल्यामुळे मनपा आयुक्त मानसी यांनी सदर निधी सभागृहाची मान्यता घेऊनच खर्च करावा, असे सांगून सभागृहाला सर्वाधिकार दिले . परंतु वित्त आयोगाचा निधी मूलभूत गरजांवरच खर्च करावा लागतो . त्यामुळे स्वच्छतेचे सहा महिन्यांपासून थकलेले देणे देण्याचा निर्णय होऊ शकतो.

## संक्षिप्त...

### प्रा.शेख एस.एल.यांना पीएचडी




तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १७ जून : येथील शिवनेरी महाविद्यालयाचे लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा. डॉ शेख एस .एल. यांनी 'अल्पसंख्याक समाजाच्या विकासात मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाची भूमिका ' विशेष संदर्भ लातूर जिल्हा या विषयावर संशोधन रेणापूर येथील शिवाजी महाविद्यालयाचे लोक प्रशासन विभाग प्रमुख डॉ. पी आर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे शोध प्रबंध सादर केला होता . प्रा शेख यांची मौखिक परिक्षा घेण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूरचे बहिस्त परिक्षक डॉ जितेंद्र वाशनिक हे होते . त्याच्या परिक्षेत उत्तीर्ण झाल्यामुळे विद्यापीठाने त्यांना नुकतीच पीएचडी पदवी प्रदान केली .

त्या निमित्त महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ एन बी सूर्यवंशी व स्टॉफ च्या वतिने सत्कार करून शुभेच्छा दिल्या . या यशाबदल संस्थेचे सचिव पदमाकर मोगरगे ,उपाध्यक्ष अँड सुतेज माने , कोषाध्यक्ष जयेश माने यांच्यासह लोकप्रशासन अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ . हनीफ शेख , सदस्य डॉ बाळासाहेब भिंगोले , विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ डी एन मोरे ,डॉ शरण निलंगेकर , डॉ दिपक वाघमारे यांनी डॉ एस एल शेख यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या .

### महिलांना शिलाई मशीन चे मोफत वाटप



तभा वृत्तसेवा

लातूर दि.१७ जून : महिलांना आर्थिक दृष्या स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने विलासराव देशमुख फाऊंडेशन च्या वतीने प्रभाग क्रं .३ मधील महिलांना शिलाई मशीनचे मोफत वाटप करण्यात आले

माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ट्वेंटीवन अँग्रो लि च्या संचालिका आदिती देशमुख यांच्या पुढाकारातून ही योजना राबविण्यात येत आहे . या भागातील महिलांना स्वयं रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा मुख्य उद्देश असल्याने या प्रभागातील ८३ महिलांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले .

- यावेळी संगीता मोळवणे, नगरसेवक विकास कांबळे, प्रवीण सूर्यवंशी, प्रेमा ठाकूर, गजानन बोयणे, सोमनाथ कावळे यांच्यासह महिला मोठ्या संस्थने उपस्थित होत्या.

## जिल्हाधिकारी डॉ बास्टेवाड यांनी तहसीलसह विविध कार्यालयाला दिली अचानक भेट




तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ : तालुका तहसील सह विविध कार्यालयाला जिल्हाधिकारी डॉ भारत बास्टेवाड यांनी अचानक भेट देऊन कामकाजाचा आढावा घेत प्रशासन अधिकारी यांना जनतेची कामे वेळेत पुर्ण करण्यासाठी सुचना करून तहसील कामाकाजा विषयी समाधान व्यक्त केले.

यावेळी तालुक्यातील जनतेच्या समस्या ऐकून संबंधित अधिकारी यांच्या समोर कामाचे निवारण केले. याप्रसंगी पंचायत समिती सदस्य हमीद पटेल यांनी तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना बांधकामासाठी वाळू मोफत देण्याची मागणी केली असता तात्काळ प्रशासकीय अधिकारी यांना घरकुल लाभार्थी यांना मोफत वाळू देण्याची सुचना केल्या, काही लोकांनी पिण्याच्या पाण्याच्या समस्या मांडल्या असता सध्या पाऊस थांबला आहे पाणीटंचाई भासू नये यासाठी तालुक्यातील घरणी,पांढरवाडी,साकोळ मध्यम प्रकल्पातून पाणी उपसा तात्काळ थांबवून कारवाई करण्याचे आदेश दिले धरणातील पाणीसाठा आरक्षित करण्याच्या संबंधित अधिकाऱ्यांना सुचना दिल्या.ज्या शेतकऱ्यांना राशन मिळत नाही आशा लाभार्थी शेतकऱ्यांचे ७२ लाख रुपये वाटप थकीत होते .लातूर पुरवठा विभागाकडून तात्काळ वाटप करण्यासाठी लातूर पुरवठा विभागाला आदेश दिले.

यंदा पाऊस लांबला असून शेतकरी बांधवांनी चिंता करु नये प्रशासन तुमच्या सोबत असून खते बियाणे याची विक्री सुरुळीत असून अडचणी आल्यास आमच्याकडे संपर्क साधावा अशा सुचना शेतकऱ्यांना केल्या शेतकऱ्यांनी चांगला पाऊस व जमिणीत भरपूर ओल झाल्यानंतरच खरीप पेरणी करावी जमिनीतील पाणी जमिनीत मुरवावे,घर व परिसरातील पाणी बोर, परसबाग, सार्वजनिक विहिरीत मुरवून पुनर्भरण करावे असे उपस्थित ग्रामस्थांना आवाहन केले. जिल्हाधिकारी डॉ बास्टेवाड यांनी येथील नगरपंचायत व ग्रामीण रुग्णालयास भेट दिले.यावेळी निलंगा उपविभागीय अधिकारी शरद झाडके,तहसीलदार किशोर यादव,नायब तहसीलदार लालासाहेब कांबळे,मंडळ अधिकारी नवनाथ खंदाडे, नितीन बनसोडे व तालुक्यातील सर्व विभागांचे कार्यालय प्रमुख अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## कृषी महाविद्यालयच्या विद्यार्थ्यांचा डीसीसी बँकेत जनजागृती उपक्रम

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १७ जून : ग्रामीण कृषी कार्यानुभव व कृषी आधारित उद्योग उपक्रम अंतर्गत कृषी महाविद्यालय, लोदगा येथील चौथ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांनी दि. १६ जून रोजी लातूर येथील टिळक नगर परिसरातील लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत शेतकरी जनजागृती कार्यक्रम आयोजित केला. लातूर जिल्ह्यातील सर्वात मोठ्या व प्रशस्त बँकांपैकी एक असलेल्या या बँकेची स्थापना सन १९८४ मध्ये झाली आहे.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या कर्ज योजना, व्याजदर, आवश्यक कागदपत्रे, अर्ज भरण्याची प्रक्रिया, बचत खाते, धनादेश (चेक), आरटीजीएस, पैसे जमा व पैसे काढण्याच्या सुविधा याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच बँकेच्या विविध सेवांचा प्रभावी वापर कसा करावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमास कृषी महाविद्यालय लोदगा चे प्रभारी प्राचार्य श्री. ऋषिकेश जगताप, कार्यक्रम अधिकारी प्रा. विद्या कदम तसेच कृषी अर्थशास्त्र विभागाचे प्रा. विशाल कांबळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

उपक्रमात विद्यार्थी ज्ञानेश्र्वर सिताराम जाधव, कृष्णा चपटे, विशाल भोसले, वैभव दीक्षित, भागवत जाधव, राजेश गोचडे, अफवान काजी, आनंदराज गायकवाड व अभिषेक फुलसागर यांनी सक्रिय सहभाग घेतला. विशेषतः विद्यार्थी ज्ञानेश्र्वर सिताराम जाधव यांनी शेतकऱ्यांना बँकिंग व्यवहार, कर्ज प्रक्रिया व विविध योजनांबाबत सविस्तर माहिती देऊन उपक्रमाच्या यशस्वी आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली.

## निवासी मतिमंद विद्यालयात विद्यार्थी– पालकांचे अनोखे स्वागत

### विद्यार्थी - पालकांना धोंडे जेवण : विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गणवेश वाटप






तभा वृत्तसेवा

लातूर दि. १७ जून : शाळेचा पहिलाच दिवस १५ जून असल्याने या दिवशी श्री संगमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ शिऊर द्वारा संचालित वलांडी ता. देवणी येथील छत्रपती शिवाजी महाराज निवासी मतिमंद विद्यालय आणि बजरंग निवासी अपंग विद्यालय या विद्यालयामध्ये अनोख्या पद्धतीने विद्यार्थी- पालकांचे स्वागत करण्यात आले. विशेष म्हणजे अधिकमासचा शेवटचा दिवस असल्याने सर्वांना धोंडे जेवण देण्यात आले.

तत्पूर्वी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रथम दिवसी विद्यालयामध्ये विद्यार्थी - पालक यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्याबरोबर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, गणवेश वाटप पालकांच्या हस्ते करण्यात आले. तसेच अधिकमहिण्याच्या औचित्य साधुन पालकांना व विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने धोंडे जेवण देण्यात आले. तसेच येणाऱ्या माता भगिनींना साडीचोळी देऊन त्यांची ओटी भरण्यात आली. मोठ्या उत्साहात जंगी कार्यक्रम घेण्यात आला. शिक्षण संस्थेचे संस्थापक शिवराज अष्टुरे, संस्थेच्या अध्यक्ष सौ. सरोजा अष्टुरे यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थी पालकांना शुभेच्छा दिल्या.

संतोषकुमार नाईकवाडी यांच्या सहायक आयुक्त सक्षमीकरण विभाग जिल्हा परिषद लातूर यांच्या सांगण्यावरून गायकवाड राजु (वै.सा. का.) व वाकडे बाळासाहेब (स. सल्लागार) उपस्थिती राहून कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रसाठी दोन्ही विद्यालयातील मुख्याध्यापक व सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## मनपा आयुक्त, महापौरांच्या हस्ते पुस्तकांचे वाटप

तभा वृत्तसेवा

लातूर दि.१७ जून : शहारातील साळे गल्लीतील मनपा शाळा क्रमांक ९-११ मध्ये नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प आणि खाऊ देऊन स्वागत करण्यात आले . आणि त्यांना मोफत पुस्तके, गणवेशाचे वाटप मनपा आयुक्त मानसी आणि महापौर जयश्री सोनकांबळे यांच्या हस्ते करण्यात आले .

यावेळी मनपा आयुक्त म्हणाल्या की, मन लावून अभ्यास करावा . उत्तम संस्कार आमृसात करून गुणवंत नागरिक बनावे तसेच शैक्षणिक गुणवत्ता, आधुनिक सुविधा आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे मनपा शाळा विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहे . पालकांचा या शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला असून मनपा शाळेमध्ये प्रवेश घेण्यासाठी पालकांचा कल वाढला असल्याचे चित्र दिसत आहे

## किनगाव भाजपा पदाधिकाऱ्यांची निवड



तभा वृत्तसेवा

किनगाव दि. १७ जून : येथील भारतीय जनता पार्टीच्या शहर कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांची रविवारी नियुक्ती करण्यात आली. भाजपा जिल्हा सरचिटणीस त्र्यंबक गुट्टे व शहराध्यक्ष रोकडोबा भुसाळे यांच्या हस्ते नियुक्ती प्रमाणपत्र देण्यात आले.

या निवडीत शहर उपाध्यक्षपदी अंकुश यरमुळे, शहर चिटणीसपदी बाळू चाटे, शहर सचिवपदी शिवम तांदळे, युवा मोर्चा शहर उपाध्यक्षपदी जुबेर पठाण, युवा मोर्चा शहर चिटणीसपदी दिपक दहिफळे यांचा समावेश आहे. यावेळी युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष भागवत गुट्टे, किनगाव मंडळ अध्यक्ष चंद्रप्रकाश हंगे, शहराध्यक्ष रोकडोबा भुसाळे, तालुका उपाध्यक्ष विक्रम गुट्टे, तुकाराम घुले, माधवराव दहिफळे आदी उपस्थित होते.

## महात्मा गांधी महाविद्यालयात कर्मचाऱ्यांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार




तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. १७ जून : येथील विचार विकास मंडळ संचलित महात्मा गांधी महाविद्यालयात विविध विभागांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनी फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केलेल्या पाल्यांचा सत्कार महाविद्यालयामध्ये संस्थेचे अध्यक्ष अँड किशनराव बेंडकुळे, सहसचिव सुरेशराव देशमुख व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला. यामध्ये अभिमन्यू सचिन सुरवसे, कु. सिद्धी शिवाजी काटे, कु. आर्या विठ्ठल गंगथडे, केदार कल्याण माने, युगंधर बाळासाहेब शिंदे, कु. राजनंदिनी बाळासाहेब बेंडकुळ, कु. संस्कृती यादव सूर्यवंशी, अभय नामदेव शिंदे, कु. मनस्वी यादव जगताप, शंभूराजे सचिन काटे या विद्यार्थ्यांचा सत्कार व अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## विद्यार्थ्यांना एसटी पासेस चे वाटप



तभा वृत्तसेवा

किनगाव दि. १७ जून : अहमदपूर येथील आगाराच्यावतीने एसटी बस ने प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांना डॉ. मंजुषा लटपटे उपजिल्हाधिकारी अहमदपूर यांच्या हस्ते नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी महात्मा गांधी विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या अकरावी व बारावीच्या मुलींना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अहमदपूर आगारातर्फे अहिल्याबाई होळकर पासेसचे वितरण करण्यात आले., व सदर शिक्षणाचे व पासेस चे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले.

या उपक्रमास महात्मा गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार , प्राध्यापक गुळवे सर, आगारप्रमुख अमर पाटील, सहाय्यक वाहतूक अधीक्षक चॉद देशमुख, वाहतूक नियंत्रक होळकर साहेब आदी मान्यवरांची उपस्थिती होती. सदर पासेस मिळाल्यामुळे विद्यार्थिनींनी आनंद व्यक्त केला.

प्राथमिक स्वरूपात काही विद्यार्थिनींना एसटी पासेसचे वाटप यावेळी करण्यात आले .....

## गुरुकुलात् कीर्तनकार ,पखवाज वादक यांचे प्रशिक्षण होणार



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. १७ जून : येथील राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज भक्ती स्थळ येथे शिव संप्रदायाक गुरुकुल चा शुभारंभ भक्ती स्थळाचे प्रमुख आचार्य गुरुराज स्वामी महाराज यांच्या शुभहस्ते व किर्तन केसरी भगवंतराव पाटील चांभारेकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला भक्ती स्थळ हे अध्यात्मिक क्षेत्रातील ऊर्जा स्थान असून राष्ट्रसंत डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराज यांची संजीवन समाधी आहे वीरशैव परंपरेतील भजन व कीर्तन परंपरा संत शिरो मनमत स्वामी नंतर राष्ट्रसंत डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराजांनी समर्थपणे सांभाळली वीर शिव संप्रदाय कीर्तनकार प्रवचनकार पखवाज वादक यांच्या प्रशिक्षणासाठी गुरुकुल कार्यरत राहणार असून त्यांच्या निवास व प्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे तसेच त्यांच्या शालेय शिक्षणासाठी शाळेची ही व्यवस्था करण्यात आली असून मराठी सेमी इंग्रजी माध्यमातील अनेक विद्यार्थ्यांनी यात प्रवेश घेतला आहे या गुरुकुलात शालेय शिक्षणाबरोबर दररोज सकाळी शिवपाठ संजीवन समाधी आरती सायंकाळी शिव भजन शिव पूजा व संस्कारक्षम विद्यार्थी घडवण्याचे काम होणार असल्याचे संचालक कपिल भालके यांनी सांगितले

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## जगदंबा विद्यालयात प्रवेशोत्सव; विद्यार्थ्यांना मोफत साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.१७ जून -**

कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जगदंबा माध्यमिक विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ व खाऊ देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत वही-पुस्तके व गणवेश वाटप करण्यात आले.




तसेच आदिवासी सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले. मार्च २०२६ च्या दहावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकांसमवेत सत्कारही करण्यात आला.

कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष अशोक शेळके, उपाध्यक्ष सुरेश (बापू) पाटील, संचालक मंडळाचे सदस्य, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, पत्रकार, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### पिंपळगाव डोळा शाळेत ६० विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप

**कळंब, दि.१७ जून -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपळगाव डोळा येथे शिक्षणप्रेमी कल्याण बापू टेकाळे यांच्या वतीने रत्नदीप कल्याण टेकाळे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत शाळेतील ६० विद्यार्थ्यांना उच्च प्रतीच्या स्कूल बॅग देण्यात आल्या. गतवर्षी शाळेने गुणवत्तेमध्ये मिळवलेल्या यशाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत व्हावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. एनएमएमएस व एनएसएसई स्पर्धा परीक्षांमधील विद्यार्थ्यांच्या यशाबद्दलही ग्रामस्थांनी कौतुक व्यक्त केले. यावेळी अशोक जगताप, नवनाथ जमाले, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कालिदास दत्त, मुख्याध्यापक नवनाथ तुंदारे, शिक्षिका सुरेखा भावले तसेच शिक्षक विशाल गंभीरे, लक्ष्मीकांत रामढवे आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



### मोहरम सण शांततेत साजरा करण्याचे आवाहन

**लोहारा, दि.१७ जून -**

मोहरम सण धार्मिक परंपरा आणि सामाजिक उपक्रमांसह शिस्तबद्ध व शांततेत साजरा करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय पवार यांनी केले. मोहरम सणाच्या पार्श्वभूमीवर लोहारा पोलीस ठाण्यात १६ जून रोजी विजय पवार यांच्या अध्यक्षतेखाली शहर व तालुक्यातील नागरिक आणि पोलीस पाटील यांची बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी त्यांनी सण शांततेत आणि सौहार्दपूर्ण वातावरणात पार पाडण्याचे आवाहन केले. बैठकीस पोउनि. सचिन केंद्रे, विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी, मोहरम कमिटी सदस्य, पोलीस पाटील आणि नागरिक उपस्थित होते.

### ३.९० लाखांचा दंड वसूल

**धाराशिवा, दि.१७ जून -**

शहर वाहतूक शाखा आणि संबंधित पोलीस ठाण्यांनी १६ जून रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष कारवाई नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात एकूण ४८० कारवाया केल्या. या कारवाईत वाहनचालकांकडून एकूण ३ लाख ९० हजार रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.



# परंड्यात अंमली गोळ्यांची विक्री करणाऱ्यावर कारवाई; ५७ हजारांचा मुद्देमाल जप्त



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१७ जून -**

अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सने (NTF) परंडा शहरात धडक कारवाई करत अंमली गोळ्यांची अवैध विक्री करणाऱ्या एका व्यक्तीस अटक केली असून, त्याच्याकडून ५७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि.१५ जून २०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, छत्रपती संभाजीनगर यांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार पथकाने दोन पंच व अन्न व औषध प्रशासनाच्या निरीक्षकांसह परंडा शहरातील शासकीय रुग्णालयाच्या मागील परिसरात सापळा रचला. मिळालेल्या माहितीची खात्री झाल्यानंतर शाहीद सादिक शेख (वय ३९, रा. परंडा, जि. धाराशिव) याच्यावर सायंकाळी ५ वाजता छापा टाकण्यात आला.

पंचांसमक्ष घेतलेल्या अंगझडतीमध्ये आरोपीकडे Nitrozepam आणि Iprazolam घटक असलेल्या विविध प्रकारच्या ११८ अंमली गोळ्या आढळून आल्या. यामध्ये Niteor-१० च्या १५ गोळ्या, Nizascen-१० च्या १० गोळ्या आणि nzilum ०.५ च्या ९३ गोळ्यांचा समावेश आहे. तसेच अंमली गोळ्यांच्या विक्रीसाठी वापरण्यात येणारा विवो कंपनीचा मोबाईलही जप्त करण्यात आला.

अंमली पदार्थ व मोबाईलसह एकूण ५७,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपीला परंडा पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले. याप्रकरणी गुन्हा क्रमांक ३९०/२०२६ अन्वये NDPS कायदा कलम ८ (सी), २२ (ए) तसेच औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा कलम १८ (क) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सच्या पोलीस महानिरीक्षक ज्योतीप्रिया सिंह, पोलीस अधीक्षक अजीत टिके आणि उपविभागीय पोलीस अधिकारी साईनाथ ठोबरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोनि. गीता बागवडे, पोउनि. प्रदीप ठाकूर, सपोउनि. वाहेद मुल्ला, हनुमान पुरके, हवालदार सुरेश राऊत, नागेश केंद्रे, निलेश सरपाळे, हरीशचंद्र मुंढे व ज्योती किर्तीकर यांनी सहभाग घेतला.

## केशेगाव येथे तीन तासांत गावठाण डीपी बसवून वीजपुरवठा सुरळीत



**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१७ जून -**

तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथे गावठाण डीपी निकामी झाल्याने वीज व पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता. संबंधित लाईनमन यांना माहिती देताच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सहकार्याने अवघ्या तीन तासांत नवीन डीपी बसवून वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला.

या कामासाठी खापरे, तगारे आणि डी.वाय. भोसले यांच्या सहकार्याबरोबरच पंचायत समिती सदस्य जयश्री कोळी व युवा नेते योगीनाथ जळकोटे यांनी पाठपुरावा केला. कमी वेळेत समस्या दूर झाल्याने ग्रामस्थांकडून संबंधितांचे कौतुक करण्यात येत आहे.

## तुळजापूर पोलीस प्रशासनाने आत्मचिंतन करावे : विशाल रोचकरी

### कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नावर जनहित संघटनेचे साखळी उपोषण...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ जून -**

श्रीक्षेत्र तुळजापूर येथे वाढत्या अवैध धंदे, गुन्हेगारी आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नांवर जनहित संघटनेच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या साखळी उपोषणाला विविध स्तरातून पाठिंबा मिळत असल्याचे दिसून येत आहे. यावेळी प्रक्षाळ मंडळाचे अध्यक्ष विशाल रोचकरी यांनी पोलीस प्रशासनाने आत्मचिंतन करून प्रभावी उपाययोजना कराव्यात, असे मत व्यक्त केले.






तुळजापूर हे राज्यातील महत्त्वाचे धार्मिक तीर्थक्षेत्र असून येथे कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याची जबाबदारी प्रशासनावर असल्याचे त्यांनी सांगितले. शहरात वाढत्या अवैध धंद्यांमुळे चोरी, लुटमार आणि अन्य गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असल्याचा आरोप जनहित संघटनेचे पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे. संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री तसेच गृहमंत्र्यांकडे निवेदन सादर करण्यात आले असून, त्यामध्ये शहरात एमडी ड्रग्ज, गुटखा, मटका, आयपीएल सट्टा, गांजा, हातभट्टी दारू, अनधिकृत ताडी विक्री आणि ऑनलाइन जुगार यांसारख्या अवैध व्यवसायांचे प्रमाण वाढल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकारांना आळा घालण्यासाठी संबंधित यंत्रणांनी कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

तसेच निवेदनात तुळजापूर पोलीस ठाण्याचे काही अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करण्यात आले असून, त्यांच्याविरोधात चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि गोपनीय चौकशी करून सत्य परिस्थिती समोर आणावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. अजय साळुंके यांच्या नेतृत्वाखाली तहसील कार्यालयासमोर सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत साखळी उपोषण सुरू असून, विविध सामाजिक संघटना, कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक आणि काही राजकीय पक्षांनीही आंदोलनाला पाठिंबा दर्शविला असल्याचे सांगण्यात आले.

या प्रकरणी पोलीस प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

## मद्यपी दुचाकी चालकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ जून -**

मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालवून मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी आनंदनगर पोलिसांनी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फरीद अजीजोद्दीन शेख (वय ३२, रा. समर्थनगर, धाराशिव) हे १६ जून रोजी रात्री वरुडा रोड परिसरात एमएच-२५ एए-८०५५ क्रमांकाची दुचाकी मद्यधुंद अवस्थेत चालवत असल्याचे आढळून आले.

## आयटीआय विद्यार्थ्यांना भविष्यात मोठ्या संधी : उपजिल्हाधिकारी प्राजक्ता पाटील साळुंखे



### वेद शैक्षणिक संकुलात आयटीआयच्या विद्यार्थ्यांनी निरोप...

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१७ जून -**

येणाऱ्या काळात तंत्रशिक्षणाला मोठे महत्त्व प्राप्त होणार असून आयटीआयमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. विद्यार्थ्यांनी आवश्यक कौशल्ये आत्मसात केल्यास त्यांना राष्ट्रीय तसेच जागतिक स्तरावर मोठी मागणी राहील, असे प्रतिपादन कळंबच्या अप्पर तहसीलदार प्राजक्ता पाटील साळुंखे यांनी केले.

त्या वेद शैक्षणिक संकुलातील भैरवनाथ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या आयटीआय विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सतीश मातने होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सुशील शेळके, आयटीआयचे प्राचार्य सूरज भांडे तसेच प्रा. सुकेशनी गव्हाणे-मातने उपस्थित होत्या.

मार्गदर्शन करताना प्राजक्ता पाटील साळुंखे म्हणाल्या की, आयटीआयचे शिक्षण पूर्ण झाले म्हणजे शिक्षणाचा प्रवास संपला असे नाही. उद्योग, व्यवसाय किंवा नोकरी करत असतानाही विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाच्या संधींचा लाभ घ्यावा. बाह्य शिक्षणाच्या माध्यमातून पुढील शिक्षण घेऊन स्पर्धा परीक्षांची तयारी करावी. प्रशासकीय सेवांमध्ये जाण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांनी त्या दिशेने प्रयत्न करावेत. हे क्षेत्र आव्हानात्मक असले तरी त्यामध्ये प्रतिष्ठा आणि संधी दोन्ही उपलब्ध आहेत. यावेळी त्यांनी एमपीएससी परीक्षेच्या तयारीतील स्वतःचे अनुभवही विद्यार्थ्यांशी शेअर केले.

प्रा.डॉ. सुशील शेळके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य सतीश मातने यांनी सांगितले की, भैरवनाथ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून बाहेर पडणारा विद्यार्थी कौशल्यसंपन्न असतो. त्यामुळे त्याला मोठ्या कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी सहज उपलब्ध होतात. विद्यार्थ्यांनी प्रगतीसाठी आवश्यक असल्यास गावाबाहेर जाऊन काम करण्याची तयारी ठेवावी, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य सूरज भांडे यांनी केले. सूत्रसंचालन अविनाश म्हेत्रे यांनी केले तर आभार गिरीधर कवडे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजकुमार शिंदे, सुप्रिया चव्हाण, दीक्षा गायकवाड आणि विनोद कसबे यांनी परिश्रम घेतले.

## अणदूरच्या जवाहर विद्यालयातील विद्यार्थिनींना ‘अहिल्याबाई होळकर मोफत एसटी पास’चे वितरण



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१७ जून -**

जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अणदूर येथे बुधवारी (दि. १७ जून) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या तुळजापूर आगारामार्फत परगावाहून ये-जा करणाऱ्या इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थिनींना ‘अहिल्याबाई होळकर मोफत एसटी पास’चे वितरण करण्यात आले.

जवाहर विद्यालयात खानापूर, इटकळ, चापला तांडा, पिंजारवाडी, केशेगाव, बाभळगाव, केरूर, शिरगापूर, चव्हाणवाडी, धनगरवाडी, सराटी, फुलवाडी, नळदुर्ग, साखर कारखाना, वसंतनगर, गुळहळ्ळी, शहापूर, मुर्टा, जळकोट, आष्टा मोड, भोसगा, हंगरगा, बोरगाव आणि खुदावाडी आदी गावांमधून सुमारे ६०० विद्यार्थिनी नियमित शिक्षणासाठी अणदूर येथे ये-जा करतात.

या कार्यक्रमास तुळजापूर आगाराचे आगार व्यवस्थापक महेश रामपुरे, सहाय्यक निराशा चौरे, विद्यालयाचे मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अणदूर वाहतूक नियंत्रण कक्ष प्रमुख राजकुमार चव्हाण, पास विभागप्रमुख सिद्धेश्वर मसुते तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण करण्यात आले. उर्वरित विद्यार्थिनींना पुढील आठवड्यात पास वितरित करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच विद्यार्थिनी सुरक्षितपणे शाळेत ये-जा करू शकतील यासाठी विद्यालयाकडून सातत्याने प्रयत्न करण्यात येत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

## कंटेकुर शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात; विद्यार्थ्यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१७ जून -**

उमरगा तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कंटेकुर येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी प्रवेशोत्सव आणि शाळेचा पहिला दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना फुले, खाऊ, शालेय गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. प्रवेशोत्सवानिमित्त शाळा परिसर आकर्षक सजावटीने सजविण्यात आला होता. यावेळी पंचायत समितीच्या सभापती आकांक्षाताई चौगुले यांनी विद्यार्थ्यांना नियमित शिक्षण आणि गुणवत्तापूर्ण अभ्यासाचे महत्त्व पटवून दिले.

## पवनचक्की प्रकल्पांसाठी वीज खांबांचे स्थलांतर; नियम धाब्यावर की महावितरणचे संगनमत?

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१७ जून -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात विविध पवनऊर्जा प्रकल्पांच्या उभारणीची कामे वेगाने सुरू असताना, अवजड साहित्य वाहतुकीसाठी अनेक ठिकाणी महावितरणच्या विद्युत खांबांचे स्थलांतर, वीजतारांमध्ये बदल तसेच इतर विद्युत यंत्रणांमध्ये फेरबदल करण्यात येत असल्याची चर्चा रंगली आहे. या पार्श्वभूमीवर वीज खांब स्थलांतराचे नियम धाब्यावर बसविले जात आहेत का? तसेच महावितरणचे दुर्लक्ष की संगनमत? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

तालुक्यातील तेरखेडा, खामकरवाडी, सटवाईवाडी यांसह अनेक गावांच्या परिसरात पवनचक्की प्रकल्पांची कामे सुरू आहेत. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पवनचक्कीच्या अवजड साहित्याच्या वाहतुकीसाठी काही ठिकाणी विद्युत खांब आणि वीजतारा हलविण्याची कामे केली जात आहेत. मात्र ही कामे संबंधित विभागाच्या अधिकृत मंजुरीनंतर आणि नियमांचे पालन करून होत आहेत की नाहीत, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

दरम्यान, या कामांमुळे अनेकदा वीजपुरवठा खंडित करण्यात येत असल्याने सर्वसामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः उकाड्याच्या दिवसांत वारंवार वीज बंद होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. वीजपुरवठा खंडित होण्याबाबत विचारणा केल्यास तांत्रिक बिघाड, फ्युज उडणे किंवा देखभाल-दुरुस्तीची कारणे सांगितली जात असल्याचा दावा काही ग्रामस्थांनी केला आहे.



विशेष म्हणजे हा प्रकार एखाद्या एका गावापुरता मर्यादित नसून वाशी तालुक्यातील विविध भागांमध्ये सुरू असल्याची चर्चा आहे. त्यामुळे महावितरणच्या मालमत्तेमध्ये बदल करताना आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया, तांत्रिक मंजुरी आणि नियमांचे पालन केले जात आहे का, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, पवनचक्की कंपन्यांच्या कामांना गती देताना नियमांना बगल दिली जात असेल तर त्याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. तसेच महावितरण विभागाने या कामांबाबत अधिकृत भूमिका स्पष्ट करून खांब स्थलांतर, वीजतारा बदल आणि त्यासाठी घेतलेल्या परवानग्यांची माहिती जनतेसमोर मांडावी, अशी मागणीही पुढे येत आहे.

या सर्व घडामोडींमुळे वीज खांब स्थलांतराचे नियम धाब्यावर?; महावितरणचे दुर्लक्ष की संगनमत? हा प्रश्न सध्या वाशी तालुक्यात चर्चेचा केंद्रबिंदू ठरत असून संबंधित विभागाच्या भूमिकेकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.



## जाहिर प्रगटन

जा.क्र.२०२६/संकीर्ण/कावी-५९ तहसिल कार्यालय, भूम दि. / / २०२६

समस्त गावकरी आष्टा ता. भूम जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात **श्री. राहुल प्रकाश वेदपाठक** रा. आष्टा ता. भूम यांनी जन्म आदेश मिळणेबाबत अर्ज केला आहे.

जन्म झालेल्याचे नाव **राहुल प्रकाश वेदपाठक यांचा जन्म दि. २१/१२/१९८५** या दिवशी आष्टा या ठिकाणी झाला असुन आदेश मिळणे संबंधी सदरील कार्यालयात **दि.१६/१/२०२६** रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म नोंद बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. मुदतीनंतर च्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही, यांची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**जयवंत पाटील,**
**तहसीलदार, भूम**

